एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम -२ अंतर्गत परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी यांना विविध विभागांतर्गत खातेनिहाय संलग्न प्रशिक्षण, जिल्हास्तरीय प्रशिक्षण व स्वतंत्र कार्यभार-६६ आठवड्यांच्या प्रशिक्षणासाठी जिल्हा वाटप

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांक :-संकिर्ण-०९१५/प्र.क्र.२२२/ई-२,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ०८ ऑक्टोबर, २०१५.

संदर्भ :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/१२-अ, दि.२०.१.२०१४
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग,क्र.टिआरएन-१११४/प्र.क्र.८३/१४/१८-ब,दि.३.११.२०१४
३) शासन परिपत्रक,सामान्य प्रशासन विभाग,क्र.टिआरएन-०८१४/प्र.क्र.६४/१४/१८-ब, दि.११.११.२०१४
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.टिआरएन-१११४/प्र.क्र.८४/१८-ब, दि.२२.४.२०१५
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.टिआरएन-२०१५/प्र.क्र.४६/१४/१८-ब, दि.१७.४.२०१५
६) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.इएसटी-२०१५/प्र.क्र.५३/ई-८, दि.५.५.२०१५
७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.टिआरएन-०७१५/प्र.क्र.११३/१८-ब, दि.२०.८.२०१५
८) शासन पत्र, महसूल व वन विभाग, क्र.इएसटी-२०१५/प्र.क्र.५३/ई-८, दि.८.१०.२०१५

आदेश :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारस प्राप्त उपजिल्हाधिकारी, (गट-अ) यांचे एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-२ अंतर्गत विविध विभागांतर्गत खातेनिहाय संलग्न प्रशिक्षण, जिल्हास्तरीय प्रशिक्षण व स्वतंत्र कार्यभार या ६६ आठवड्यांचे प्रशिक्षण दि.१९.१०.२०१५ पासून सुरु होणार आहे. शासनाने निश्चित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमानुसार परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी यांना प्रशिक्षणासाठी खालीलप्रमाणे जिल्हा वाटप करण्यात येत आहे:-

अ.क्र.	अधिकारी/प्रशिक्षणार्थीचे नाव	प्रशिक्षणाकरिता वाटप करण्यात आलेला जिल्हा /विभाग	
		जिल्हा	विभाग
१.	श्री. मोहिते अभयसिंह अर्जुनराव	उस्मानाबाद	औरंगाबाद
२.	श्री. शेंडगे समाधान चांगदेव	सोलापूर	पुणे
३.	श्री. खेडेकर प्रशांत कैलास	अहमदनगर	नाशिक
४.	श्री. साकोरे विशाल विलास	रायगड	कोकण
५.	श्री.शर्मा विजयानंद स्वानंद	जळगांव	नाशिक
६.	श्री. मोरे स्वप्नील भारत	बीड	औरंगाबाद
७.	श्री. देशमुख अभिषेक आबाराव	रत्नागिरी	कोकण
८.	श्री. गव्हाड मनोहर वसंत	औरंगाबाद	औरंगाबाद
९.	श्री.सदगिर नितीन किसन	ठाणे	कोकण

१०.	श्री.बांदल विक्रम वसंत	धुळे	नाशिक
११.	श्री.थोरबोले अजित प्रकाश	नांदेड	औरंगाबाद
१२.	श्री. कापडनिस स्वप्नील अरुण	मुंबई उपनगर	कोकण
१३.	श्री.भोसले अमोलसिग अंकुशराव	जालना	औरंगाबाद
१४.	श्री.बानापुरे ज्ञानोबा पुंडलिकराव	लातूर	औरंगाबाद
१५.	श्री. तांगडे स्वप्नील सुभाषराव	गडचिरोली	नागपूर
१६.	श्रीमती लाभशेतवार वनश्री अवधुत	सातारा	पुणे
१७.	श्री. भंडारे सिद्धार्थ वसंता	गोंदीया	नागपूर
१८.	श्रीमती देशमुख शितल शरदराव	मुंबई उपनगर	कोकण
१९.	श्रीमती पवार प्रियंका लालासो	ठाणे	कोकण
२०.	श्रीमती देशमुख चारुशिला प्रकाश	नाशिक	नाशिक
२१.	श्री खेडकर महादेव विक्रम	यवतमाळ	अमरावती
२२.	श्री अर्जुन श्रीनिवास महादेवराव	परभणी	औरंगाबाद
२३.	श्री कांबळे अमोल जगन्नाथ	सांगली	पुणे
२४.	श्री चव्हाण मुकेश किसन	नंदुरबार	नाशिक
२५.	श्री मोरे शाहुराज संभाजीराव	चंद्रपूर	नागपूर
२६.	श्रीमती डोंबे क्रांती काशीनाथ	वाशिम	अमरावती
२७.	श्रीमती भोसले वर्षाराणी केशवराव	पुणे	पुणे
२८.	श्री गायकवाड निवृत्ती हिरामन	बुलढाणा	अमरावती
२९.	श्रीमती सावंत गौरी रत्नाकर	औरंगाबाद	औरंगाबाद
३०.	श्री मेश्राम विशालकुमार शालिकराम	अमरावती	अमरावती
३१.	श्रीमती नाष्टे अर्चना कल्याण	उस्मानाबाद	औरंगाबाद
३२.	श्रीमती कानीचे सखाराम स्नेहल	पालघर	कोकण
३३.	श्री कचरे राजेंद्र दिलीप	अकोला	अमरावती
३४.	श्री काळे विवेक विठ्ठल	बीड	औरंगाबाद
३५.	श्रीमती शिंदे सुचिता	कोल्हापूर	पुणे
३६.	श्रीमती मोरे अर्चना अर्जुन	रत्नागिरी	कोकण
३७.	श्री महाडिक गणेश भिकाजी	नागपूर	नागपूर
३८.	श्रीमती गाडेकर उज्वला कुंडलिक	सिंधुदूर्ग	कोकण
३९.	श्रीमती लांडगे वर्षा भिमराव	जळगांव	नाशिक

१) उपरोक्त परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी यांना ६६ आठवड्यांचे विविध विभागांतर्गत खातेनिहाय संलग्न प्रशिक्षण, जिल्हास्तरीय प्रशिक्षण व स्वतंत्र कार्यभार प्रशिक्षण कार्यक्रमासंदर्भात स्वतंत्र पुस्तिका प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी यांनी परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी यांचा

दि.१९.१०.२०१५ पासून प्रशिक्षण कार्यक्रम तात्काळ तयार करावा व त्याची प्रत परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी यांना उपलब्ध करून द्यावी.

२) परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी यांनी दैनंदिन रोजनिशी दररोज न चुकता ई-मेलद्वारे संबंधित जिल्ह्यातील निवासी उपजिल्हाधिकारी व संपर्क /समन्वय अधिकारी उपायुक्त (महसूल) यांना सादर करावी.

३) परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी यांना संलग्न करण्यात आलेल्या संघटनेची रचना व कार्य याबाबत झालेल्या ज्ञानाची पडताळणी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी दर १५ दिवसांनी मुल्यांकन चाचण्या घ्याव्यात व त्याचे निष्कर्ष समन्वय अधिकारी उपायुक्त (महसूल) यांच्याकडे उपलब्ध करुन द्यावेत.

४) परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी यांच्या दैनंदिन उपस्थिती/ अनुपस्थिती/ वर्तन इ.बाबत संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनी समन्वय अधिकारी उपायुक्त (महसूल) यांना अहवाल सादर करावा.

५) प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थीने गैरवर्तन केल्याचे अथवा प्रशिक्षण पुरेशा गांभीर्याने घेत नसल्याचे निदर्शनास आल्यास अशा घटना त्वरीत संबंधित जिल्हाधिकारी यांनी समन्वय अधिकारी उपायुक्त (महसूल) यांच्याशी संपर्क साधून निदर्शनास आणून देण्यात याव्यात. तसेच गैरवर्तनाची नोंद संबंधिताच्या वैयक्तिक सेवा अभिलेखात नोंदवाव्यात. तसेच या संबंधित अहवाल समन्वय अधिकारी उपायुक्त (महसूल) यांनी शासनाच्या महसूल व वन विभाग व सामान्य प्रशासन विभागास सादर करावा.

६) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.इएसटी-२०१५/प्र.क्र.५३/ई-८, दि.५.५.२०१५ मधील परिच्छेद क्र.(२) मध्ये नमूद केल्यानुसार, परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी यांना प्रशिक्षणासाठी वाटप केलेल्या विभागातील विभागीय आयुक्त यांच्या आस्थापनेवर दि.१९.१०.२०१५ ते दि.१८.०३.२०१७ या कालावधीकरिता अधिसंख्य पदे निर्माण होतील. प्रशिक्षणार्थींना वाटप केलेल्या विभागातील परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी यांचे वेतन व भत्ते संबंधित विभागीय आयुक्त यांचेमार्फत अदा करण्यात येतील.

७) ६६ आठवड्यांच्या कालावधीत परिविक्षाधीन अधिकाऱ्यांच्या किमान २ विभागीय परीक्षा घेणे अपेक्षित आहे. त्यासाठी संबंधित विभागीय आयुक्तांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि शासन यांच्याशी समन्वय साधून वेळापत्रक निश्चित करावे.

८) परिविक्षाधीन उपजिल्हाधिकाऱ्यांना प्रशिक्षणासाठी वाटप केलेल्या संबंधित जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी यांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.टीआरएन-०८१४/प्र.क्र.६४/१४/१८-ब, दि.११.११.२०१४ मधील सूचनांचे काटेकोरपणे पालन होण्यासाठी समन्वय अधिकारी उपायुक्त (महसूल) यांचेशी संपर्क साधून प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी योग्य ती दक्षता घ्यावी.

९) ६६ आठवड्यातील विभागीय प्रशिक्षणाच्या टप्प्यामध्ये परिविक्षाधीन उपजिल्हाधिकाऱ्यांचे मुल्यमापन करण्यासाठी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.टीआरएन-१११४/प्र.क्र.८४/१८-ब,

दि.२२.४.२०१५ मधील निर्देशानुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी समन्वय अधिकारी उपायुक्त (महसूल) यांची राहील.

१०) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. शासन आदेश क्र.०४१५/प्र.क्र.१२२/ई-२ दि.१५.०९.२०१५ नुसार परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी यांना वाटप केलेल्या विभागातील समन्वय अधिकारी म्हणून उपायुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार समन्वय अधिकारी उपायुक्त (महसूल) यांनी प्रशिक्षण कार्यक्रम पार यशस्वीपणे पाडण्यासाठी योग्य ती दक्षता घ्यावी.

११) परिविक्षाधीन उपजिल्हाधिकाऱ्यांना केवळ ६६ आठवड्यांच्या प्रशिक्षणासाठीच जिल्हा वाटप करण्यात येत आहे.

१२) महासंचालक यशदा यांनी परिविक्षाधीन उपजिल्हाधिकाऱ्यांना प्रशिक्षणासाठी वाटप केलेल्या जिल्हयात रुजू होण्यासाठी त्वरीत कार्यमुक्त करावे.

१३) परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी यांनी त्यांना प्रशिक्षणासाठी वाटप केलेल्या जिल्ह्यात त्वरित रुजू व्हावे व तसा अनुपालन अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(माधव काळे)
शासनाचे उपसचिव

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त,
२. सर्व जिल्हाधिकारी,
३. संचालक, यशदा, पुणे
४. संचालक, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर
५. संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख विदर्भ विकास प्रशासन प्रबोधिनी, अमरावती
६. संबंधित प्रशिक्षणार्थी द्वारा- महासंचालक, यशदा, पुणे
७. उपसचिव (प्रशिक्षण),सामान्य प्रशासन विभाग(कार्यासन १८-ब),मंत्रालय, मुंबई
८. कार्यासन ई-२ निवड नस्ती, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई